# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. प्रअ/विनि/२४५७०/साधारण दि. 15-12-17

परिपत्रक

No. CHE/DP/69/GEN
2017-18

विषय - बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदींनुसार विविध विकास कामांसाठी परवानगी देण्याकरिता आणि विकास हक्क प्रमाणपत्र देण्याकरिता व त्याची पुर्नविधीग्राहयता करण्याकरिता छाननी शुल्काची पुनर्रचना करण्याबाबत.

१. मुंबई महानगरपालिकेने ठराव क्र. १०३४ दि. २४.१२.२००९ अन्वये विकास नियोजन कामासाठी परवानगी देण्याकरिता आकारण्यात येणा-या छाननी शुल्कांची अनुसूची पुनर्रचित करण्याकरिता फेरबदल प्रस्तावास मंजुरी दिली होती.

२. आता, महानगरपालिकेने ठराव क्र.९२३ दि. २३.११.२०१७ नुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या पुनर्रचित शुल्काची अनुसूची सन २०१७-१८ करिता महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सुधारित दरानुसार शुल्क आकारण्यास, तसेच सन २०१७-१८ नंतर येणा-या पुढील प्रत्येक आर्थिक वर्षात १ एप्रिलपासून विद्यमान किमान छाननी शुल्कामध्ये १० टक्के इतकी वाढ करुन येणारी रक्कम (सुधारित शुल्कदर) पुढील दहा रुपयांच्या पूर्णांकात लागू करण्याबाबत व प्रति चौ.मी. छाननी तसेच प्रपत्र शुल्कदरात १०% इतकी वाढ करुन येणारी रक्कम अपूर्णांकात असल्यास पुढील रुपयांच्या पूर्णांकात लागू करण्याबाबत मंजुरी प्राप्त झाली आहे.

३. तसेच पुढील नवीन धोरण निश्चित होईपर्यंत, सुधारित शुल्कसूचीची अद्ययावत माहिती, माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून सॅप संगणकीय प्रणालीमध्ये वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावी.

४. सदर शुल्कवाढ महानगरपालिकेच्या मंजुरीच्या दिनांकापासून म्हणजेच दि. २३.११.२०१७ पासून अंमलात येईल. तसेच दि.२३.११.२०१७ ते सदरहू परिपत्रक निर्गमित केल्याच्या तारखेदरम्यान यापूर्वीच्या दराने शुल्क आकारले असल्यास त्या त्या पक्षकारांकडून नवीन लागू करण्यात आलेल्या सुधारित शुल्काप्रमाणे येणारी रक्कम वसूल करण्यात यावी.

प्रमुख अभियंता
(विकास नियोजन)

D:\DP-13-2017\General\Circular .docx



Scanned by CamScanner

मा.आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक/ अति.आयुक्त (शहर) यांचे स्वीय सहाय्यक/ अति.आयुक्त (प्रकल्प) यांचे स्वीय सहाय्यक / अति.आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांचे स्वीय सहाय्यक / अति.आयुक्त (पूर्व उपनगरे) यांचे स्वीय सहाय्यक /संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प)/उपायुक्त (अभियांत्रिकी/ उप आयुक्त (विशेष अभियांत्रिकी)/उपायुक्त (अतिक्रमण व निर्मूलन) / संचालक (माहिती व तंत्रज्ञान विभाग) /प्रमुख लेखापाल (वित्त)/ प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)/ उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) शहर / पूर्व उपनगरे / प.उप.-१ / प.उप.-२ / वि.कक्ष /सहाय्यक आयुक्त (अतिक्रमण निर्मूलन) / सहाय्यक आयुक्त (------------------------) / कार्यकारी अभियंता (वि.नि.) शहर / पूर्व उप. / पी व आर / एच व के / कार्यकारी अभियंता (स्वीय) (वि.नि.)/मुख्य लिपिक (टिडीआर)

प्रत माहितीकरिता व पुढील ~~योग्य~~ योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना.

15/12/2017

प्रशासकीय अधिकारी-२
(विकास नियोजन)



Scanned by CamScanner

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिशिष्ट - १

### छाननी शुल्कांची अनुसूची

अ. प्रस्तावित आणि विद्यमान छाननी शुल्कांच्या श्रेणीचा तपशील.

| अ.क्र. | बाब | दि. २४.१२.२००९ च्या म.न.पा. ठराव क्र. १०३४ अन्वये शुल्क अनुसूची | आता मसुदापत्रात प्रस्तावित केलेल्या शुल्कांची सुधारित श्रेणी<br>(सुधारित किमान शुल्क पुढील १०/- च्या पूर्णांकात) व (प्रति चौ.मी. शुल्क पुढील रुपयांच्या पूर्णांकात. | अभिप्राय किती टक्के वाढ? |
|---|---|---|---|---|
| १. | सर्व आरक्षणांच्या बाबतीत विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | किमान रु. ५००० /- सापेक्ष भूखंडाच्या प्रति चौ.मी. ला रु.३८/- | किमान रु.६२५०/- सापेक्ष टीडीआर क्षेत्राच्या प्रति चौ.मी. ला रु. ४८/- | २५ टक्के |
| २. | संस्कृती वारसाच्या सर्व बांधकामांकरिता विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | २५ टक्के |
| ३. | विकास नियंत्रण नियमावली ९१ नियम क्र.९ तक्ता क्र.४ अन्वये समायोजन आरक्षणांच्या बाबतीत (ॲकमोडेशन रिझर्वेशन) विकासाची परवानगी देणे. | किमान रु. ४५००/- सापेक्ष भूखंडाच्या प्रति चौ.मी. ला रु.१०/- | किमान रु.५६३०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु. १३/- | २५ टक्के |
| ४. | विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या नियम क्र. ५६, ५७, ५८ व | नियमावली क्र. ५६, ५७, व १३ मधील तरतुदींनुसार | नियमावली क्र. ५६, ५७, व १३ मधील तरतुदींनुसार | २५ टक्के |

D:\DP-13-2017\DL 2 MS\Scrutiny fees.doc

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १३ मधील तरतुदींनुसार औद्योगिक पटट्यातील जमिनींवर निवासी / व्यावसायिक विकासास परवानगी देण्याचा प्रस्ताव. | औद्योगिक पटट्यातील जमिनींवर निवासी /व्यावसायिक विकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.४,५००/- सापेक्ष भूखंडाच्या प्रति चौ.मी. ला रु.१०/- आणि विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या नियम क्र.५८ मधील तरतुदींनुसार सुती कापड गिरण्यांच्या पुर्नविकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.९,७५०/- सापेक्ष भूखंडाच्या प्रति चौ.मी. ला रु.२३/- | औद्योगिक पटट्यातील जमिनींवर निवासी /व्यावसायिक विकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.५,६३०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.१३/- आणि विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या नियम क्र.५८ मधील तरतुदींनुसार सुती कापड गिरण्यांच्या पुर्नविकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.१२,१९०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.२९/- | |
| ५. | शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधांकरिता आरक्षित असलेल्या जमिनीच्या विकासास परवानगी देण्याचा प्रस्ताव. | किमान रु.३०००/- सापेक्ष भूखंडाच्या प्रति १० चौ.मी. ला रु.१८/- | किमान रु.३७५०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति १० चौ.मी. ला रु.२३/- | २५ टक्के |
| ६. | झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पांच्या बाबतीत विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | किमान रु.४,५००/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्राच्या प्रति चौ.मी. ला रु.१८/- | किमान रु.५,६३०/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्राच्या प्रति चौ.मी. ला रु.२३/- | २५ टक्के |
| ७. | विकास नियंत्रण नियमावली १९९१ नियम ११(४) मधील तरतूदींनुसार विकास नियोजन आरक्षण / सुविधेकरिता (आरक्षित) | प्रति प्रस्तावाकरिता रु.७,५००/- इतका ठोक आकार. | प्रति प्रस्तावाकरिता रु.९,३८०/- इतका ठोक आकार. | २५ टक्के |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | भूखंडांचे पुनरर्थापन करण्याकरिता परवानगी देणे. | | | |
| ८. | विकास नियंत्रण नियमावली क्र.६७ अन्वये विकासाकरिता परवानगी देण्याकरिता म्हणजे संस्कृती वारसा समितीकडून निर्वाळा मिळण्याच्या प्रस्तावाकरिता छाननी शुल्क | प्रति प्रस्तावाकरिता रु.३०००/- इतकी ठोक रक्कम | प्रति प्रस्तावाकरिता रु.३७५०/- इतकी ठोक रक्कम | २५ टक्के |

(ब) <u>वरील (अ) १ ते ६ करिता पुनर्विधीग्राहयता शुल्क</u>

१) (अ) १, २ व ६ प्रकरणी जारी केलेली विकास हक्क प्रमाणपत्रे ५ वर्षाकरिता विधीग्राहय राहतील आणि त्यानंतर पुढील ५ वर्षाकरिता तत्कालिन छाननी शुल्काच्या १० टक्के दराने पुनर्विधीग्राहय शुल्क वसूल करुन पुनर्विधीग्राहय केली जातील. अनुक्रमे १ , २ व ६ प्रकरणी तत्कालिन किमान शुल्क हे प्रत्येक वर्षी तत्कालिन किमान शुल्कात १० टक्के वाढ करुन येणा-या रक्कमेएवढे असेल.

२) बाब क्र. (अ) ३, ४ व ५ अन्वये दिलेल्या विकासाच्या परवानगीसंबंधी येथे नमूद करण्यात येते की, सदर परवानगी २ वर्षाच्या कालावधीकरिता विधीग्राहय राहील आणि त्यानंतर २ वर्षाकरिता तत्कालिन छाननी शुल्काच्या १० टक्के दराने पुनर्विधीग्राहय शुल्क वसूल करुन पुनर्विधीग्राहय करता येईल. तसेच तत्कालिन किमान शुल्कात दरवर्षी १० टक्के दराने वाढ होईल.

(क) विकास हक्क प्रमाणपत्राच्या वापराकरिता छाननी शुल्क

(अ) १,२ व ६ करिता किमान रु.६,२५०/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी.ला रु.४८/- या दराने वापर शुल्क आकारले जाईल.

(ड) <u>विकास हक्क प्रमाणपत्राचे हस्तांतरण</u>.

विकास हक्क प्रमाणपत्राच्या हस्तांतरणाकरिता वरील (अ) १, २ करिता किमान रु. ६,२५०/- सापेक्ष टी.डी.आर. भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी.ला रु.४८/- या दराने छाननी शुल्क आकारले जाईल व वरील (अ) ६ प्रमाणे किमान रु.५,६३०/- सापेक्ष टी.डी.आर. भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मीटरला रु.२३/- या दराने हस्तांतरण शुल्क आकारले जाईल.



Scanned by CamScanner

विकास हक्क प्रमाणपत्राचे हस्तांतरण कायदेशीर वारसाला करण्याकरिता प्रत्येक हस्तांतरणाला रु.३,७५०/- या ठोक रकमेने (दराने) छाननी शुल्क आकारले जाईल.

(इ) **विकास हक्क प्रमाणपत्र , अर्ज प्रपत्र, हस्तांतरण प्रपत्र, वापर प्रपत्र.**

विकास हक्क प्रमाणपत्राच्या अर्ज प्रपत्राकरिता रु.२००/- अधिक मूल्यवर्धीत कर (Vat) आकारले जाईल. हस्तांतरण प्रपत्र/वापर प्रपत्र याकरिता रु.४०/- अधिक मूल्यवर्धित कर (Vat) त्याचप्रमाणे वेळोवेळी शासनाकडून लागू करण्यात येणारे याप्रकारचे कर आकारण्यात येतील. सदर आकारणी वसूल करणे सोईचे व्हावे यादृष्टीने शुल्क वाढ प्रस्ताविली आहे.

| | | |
|---|---|---|
| | | (श्री.संजय पां. दराडे)<br>**प्रमुख अभियंता**<br>**(विकास नियोजन)** |

Scanned by CamScanner